
सी.बी.टी प्रकाशन



# कुकूचे घड्याळ



BVBK-0402787

1985 मध्ये चिल्ड्रन्स बुक ट्रस्टने घेतलेल्या बाल पुस्तक लिहिण्याच्या स्पर्धेत ''कुकूचे घड्याळ'' या पुस्तकाला प्रथम क्रमाकाचे पारितोषिक मिळाले होते.


लेखिका - डॉ. सौ. कावेरी भट्ट, या वृंदावन येथे रामकृष्ण मिशनच्या रूग्णालयात शल्यचिकित्सक (सर्जन) आहेत

CUCCUCHE GHARYAL (Marathi)

© by CBT 1991

ISBN 81-7011-495-0

चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नवी दिल्ली



विभाग
२७८८ दिनांक
बा.वा.

कुकू नेहमी बरोबर वेळ दाखवायची. माझा दिवस घडयाळाच्या काटयावर चालतो असे माला म्हणायची. पुष्कळदा तिचे गाणे पण ऐकू यायचे—

सहा वाजता उठून
होते तयार सातला

नऊ ते अकरा वेळ लागतो
घर सगळे आवरायला.


लहानशी डुलकी होते
जेवणानंतर एकला

येवो ऊन अगर पाऊस
चुकत नाही चहा सहाला.

वाचन किंवा विणकाम
करते सात ते आठ मी
जेव्हा कुकू गाते नऊ
झोपायला जाते मी !



अशाप्रकारे मालाचा दिनक्रम होता.






एका रविवारी माला गडबडीत होती. थोडी उतावळी पण झाली होती. तिचे किशोर वयाचे मित्र लीला व पुट्टू या दोघांना तिने चहाला बोलविले होते. त्याच रस्त्यावर असलेल्या एका घरात दोघे राहायचे व तिला बागकामात मदत करायचे. दुपारचे जेवण झाले व मालाने घड्याळाकडे दृष्टी टाकली. ''एक डुलकी काढायला हरकत नाही'' ती पुटपुटली. ''मात्र बरोबर तीनला उठून मला चहाच्या तयारीला लागलं पाहिजं,'' ती म्हणाली. माला झोपायच्या खोलीत गेली. मऊमऊ उबदार रजई पांघरून गाढ झोपी गेली.





२८८८ दिनांक ...
बा.वा. ...



दुपारची शांत वेळ होती. घरात सगळीकडे शुकशुकाट होता. फक्त दिवाणखाण्यात घडयाळाची टिक् टिक् चालू होती. कुकूला झोप आली होती. 'मला एक क्षणभरसुध्दा विश्रांती का मिळत नाही ?' आश्चर्य करीत चिमुरडी कुकू म्हणाली, पण माला झोपली आहे आता. तेव्हा मला माझं गाणं गायची काहीच गरज नाही. एक क्षणभर झोप काढूया आता. कुकूने खिडकी बंद केली. पिसापिसांच्या पंखामध्ये तिने आपले डोके खुपसले आणि झोपून गेली.

घुर... घुर... घुर...






अरे बापरे ! तीन वाजले, चार वाजून गेले तरी कुकू आपली झोपलेली. पाच वाजता कुकूला जाग आली. आळसटून तिने जांभई दिली. 'हं तिनाचे टोले आता द्यायला हरकत नाही,' कुकू म्हणाली. खिडकीतून बाहेर डोकावत ती गायला लागली–

कुहू...
कुहू...
कुहू...

'चला, उठायची वेळ झाली', माला पुटपुटली. निळचा-पांढऱ्या रंगाचा एप्रन मालाने आपल्या कंबरेला बांधला व खुशीने गाणे गुणगुणत ती गडबडीने स्वैपाकघरात शिरली. ''प्रथम मी इडल्या वाफवते. नंतर सामोसे तळते. बदामाची खीर व गाजरहलवा एकाच वेळी करता येईल. अरे हो ! चटणी करायचीं विसरून चालणार नाही.''





लीला स्वैपाकघरात गेली. माला सामोसे तळता-तळता एकीकडे चटणी वाटत होती. ती लालबुंद झाली होती व गांगरून गेली होती. ''मी तुला काही मदत करू का ?'' लीलाने विचारलं. आपला संताप कसाबसा आवरत माला धुसफुसत म्हणाली, ''तू टेबल लाव. खरोखरच मला कल्पना नव्हती तुम्ही दोन तास लवकर याल अशी !''.

''लौकर ?'' आश्चर्याने लीलाने म्हटले. ''पण..... पण..... माला आता तर सहा वाजून गेले आहेत. तू सांगितल्याप्रमाणे आम्ही बरोबर साडेपांचला आलो ग.''.

मालाला एवढे आश्चर्य वाटले की तिच्या हातातले भांडे पडणारच होते खाली. ''काही तरीच !'' ती उद्‌गारली. तिचा चेहरा लालेलाल झाला होता. ''तुम्ही चार वाजायच्या आधीच आलात. माझी तशी खात्री आहे. आतापर्यंत कुठल्याही कामाकरता, मला कधी उशीर झालेला नाही. माझ्या कुकू घड्याळा-बरोबर चाललेलं असतं माझं सगळं. ठाऊक आहे ?''








एव्हाना पुट्टूसुध्दा स्वैपाकघरात आला. त्याने सर्व बोलणे ऐकले. धावतच तो दिवाणखान्यात गेला व कुकूच्या घड्याळात बघितले. घडयाळ दोन तास मागे होते. सर्व गोंधळाचे हे कारण होते तर! बिच्चारी माला. ''मी तिला सर्व समजावून सांगतो.'' तो म्हणाला. ''कुठल्या तरी कारणाने तुझं कुकूचं घड्याळ दोन तास मागे आहे. आता तर सहा वाजून गेले आहेत.'' तो मालाला म्हणाला. ''हरकत नाही तुझं घड्याळ मी बरोबर लावून देतो.'' घड्याळाच्या पाठीमागे काही मिनिटे त्याने थोडी खुडबुड केली. ''हं अगदी बरोबर लावलं आता.'' तो उल्हासाने म्हणाला. ''मी आता टेबल मांडतो बरं का! लीला तुला फराळात मदत करील.''


२७८८






''याच्या आधी मला कधीसुध्दा उशीर झालेला नाही.''
रडकुंडीला येत माला म्हणाली. ''कुकूच्या घड्याळाबरोबर
माझा जीवनक्रम बांधलेला आहे.'' कुकू सर्व ऐकत होती.
तिला स्वतः चीच लाज वाटली. केवळ तिच्या
आळशीपणामुळे बिचा-या मालाला भलंनाच उशीर झाला
होता. ''यापुढे दुपारच्या डुलक्या बंद'' कुकूने ठरवले.
''यापुढे मी दर तासाला न चुकता कुहू-कुहू करणारी
मालाची कुकूच राहीन.

थोडयाच वेळांत फराळ तयार झाला.सर्वांना अतिशय भूक
लागली होती.त्यांनी रुचकर फराळावर ताव मारला. सोनेरी
कुरकुरीत समोसे, चटणी,बरोबर मऊ-मऊ इडल्या,गाजर
हलवा. आहा... आहा... लीला व पुट्टूने दोनदा खूपशी
बदामखीर घेतली.






''मस्त झाली हं तुझी ही चहापार्टी ! आपल्याला बुवा फारच आवडली.''

निघायच्या वेळेला पुट्टू आनंदाने म्हणाला, ''माझ्या माहितीत, तुझ्या इतकं उत्कृष्ट फराळचं करणारी दुसरी कोणीही नाही.''

# कुकूचे घड्याळ



लेखिका : कावेरी भट्ट

चित्रांकन : सुबीर रॉय

अनुवाद : अलका साने


BVBK-0402787

झिलमिल गल्लीत एक छोटे सुबक घर होते. त्यात दिसायला गोड आणि गुबगुबीत अशी माला नावाची एक मुलगी राहात होती. तिला आपले घर तर फार आवडायचेच, परंतु घरातील एक गोष्ट तिला सर्वात प्रिय होती; आणि ती म्हणजे कुकूचे घडयाळ. ते घडयाळ फार सुरेख होते. त्याची चौकट चकचकीत रोजवूड लाकडापासून बनविलेली होती. तबकडी छान होती. घडयाळाच्या वरच्या बाजूला घर होते लाल रंगाने रंगविलेले. घराला उतरते छप्पर व एक खिडकी होती. प्रत्येक तासाला घराची ती खिडकी उघडून एक छोटी चिमुकली कुकू (कोकिला) बाहेर डोकावून गात असे–

कुहू...
कुहू...
कुहू...

वेळेची आठवण करून देणारी, किती सुंदर पध्दत होती ती !






मालाच्या चेह-यावर परत हसू झळकंले आणि जेव्हा नऊ वाजले आणि कुकू गायला लागली

कुहू...

कुहू...

तेव्हा माला खुशीने झोपायला गेली.

चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नेहरु हाउस, 4 बहादुरशाह ज़फर मार्ग, नवी दिल्ली द्वारा प्रकाशित व ट्रस्ट च्या
इंद्रप्रस्थ प्रेस नवी दिल्ली मध्यें मुद्रित.



Rs. 8.00 M 23

ISBN 81-7011-495-0